**महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका,खंड-४ च्या भाग- दोन मधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती विषयक गाव नमुना नं. १२ मध्ये सुधारणा करण्याबाबत.....................**
**खाते क्रमांक समाविष्ट करण्याकरीता**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१८/प्र.क्र. १४२/ज-१ अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक: २१ डिसेंबर, २०१८.**

वाचा -

१) महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका खंड-४ भाग (दोन) यांमधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती
२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१.
३) शासन निर्णय क्रमांक:- जमीन २०१८/प्र.क्र.९२/ज-१ अ, दिनांक १० सप्टेंबर, २०१८

प्रस्तावना -

महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) मधील भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती या विषयी आहे. त्यानुसार ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन करण्याकरीता, विविध नोंदवह्यांचा गाव नमुना व दुय्यम नोंदवह्या यांचे नमुने विहीत करण्यात आलेले असुन त्याचा गोषवारा देखील देण्यात आलेला आहे.

राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती यांमधील, **गाव नमुना नंबर- ७ हा अधिकार अभिलेख** या विषयी असून यामध्ये, संबंधीत जमिनीच्या भोगवटादार यांचे नाव, शेतीचे स्थानिक नाव, भुमापन क्रमांक, भुधारणा पध्दती, धारण क्षेत्राचा तपशिल [लागवडी योग्य क्षेत्र, पोटखराब क्षेत्र (लागवडी योग्य नसलेले), एकूण क्षेत्र] , आकारणी, जुडी किंवा विशेष आकारणी, खाते क्रमांक, कुळाचे नांव, इतर अधिकार या ठळक बाबीचा तपशिल समाविष्ट आहे. तर, **गाव नमुना नं.८-अ हा धारण जमिनीची नोंदवही** असून, यासंबंधी खुलासा पाहता, सद्यस्थितीत गाव नमुना नं ८-अ मध्ये खाते क्रमांक, भुमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक, जमिनीचे क्षेत्र, वसुलीसाठी आकारणी किंवा जुडी, दुमाला जमिनीवरील नुकसान, स्थानिक उपकर यांचा अंतर्भाव आहे. **गाव नमुना नंबर- १२ हा पिकांची नोंदवही** या विषयी आहे.

क्षेत्रीय स्तरावरुन पीक पेरणी अहवालाचा Real time crop data संकलित होण्याच्या दृष्टीने, तसेच, सदर data संकलित करताना पारदर्शकता आणणे, पीक अहवाल प्रक्रीयेत शेतकऱ्यांचा सक्रीय सहभाग घेणे, कृषी पतपुरवठा सुलभ करणे, पीक विमा आणि पीक पाहणी दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ करणे, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि योग्य प्रकारे मदत करणे शक्य व्हावे इत्यादी उद्देशाने पीक पेरणीबाबतची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा (Mobile App) गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने टाटा ट्रस्ट्स यांनी एक आज्ञावली (Farmer friendly App) विकसित केली आहे. स्वत: शेतकऱ्यांनी पीक पेरणी बाबतची माहिती गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्यासाठी टाटा ट्रस्ट्स ने विकसित केलेल्या भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा उपलब्ध करून देण्याबाबतचा पथदर्शी कार्यक्रम टाटा ट्रस्ट्स च्या आर्थिक, तांत्रिक व इतर अनुषंगिक बाबींच्या सहाय्याने व सहकार्याने राज्याच्या निवडक तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भ क्र. ३ येथे नमूद शासन निर्णय दिनांक १०.०९.२०१८ अन्वये घेतला आहे.

राज्यात सध्या गाव नमुना नंबर १२ मध्ये पिकांच्या नोंदी सर्व्हे नं. निहाय घेण्यात येतात. त्यामुळे शासनाला विविध प्रयोजनार्थ इच्छित वस्तुनिष्ठ आकडेवारी उपलब्ध होत नाही. तसेच पिक पाहणीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करताना पारदर्शकता आणणे, कृषि पतपुरवठा सुलभ करणे, पिकविमा व पिकपाहणी दावे निकाली काढणे, नैसर्गिक आपत्तीमध्ये पिकांची नुकसान भरपाई रक्कम निश्चित करणे व योग्य खातेदाराला अदा करणे यासाठी खातेनिहाय पिकपाहणी करणे गरजेचे आहे. यास्तव, गा.न.नं.१२ मध्ये सुधारणा करून गा.न.नं.१२ च्या विहित नमुन्यात **खाते क्रमांक** नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच यामुळे पिक पेरणी अहवाला ची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲप (Mobile App) व्दारे गा. न. नं.१२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतक-याने उपलब्ध करून देण्याबाबतचा पथदर्शी कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यास आणि तत्संबंधीचा तपशिल संगणक प्रणालीन्वये संलग्न करण्यास मदत होईल.

या बाबी विचारात घेवून, गाव नमुना नं.- बारा - पिकांची नोंदवही या नमुन्या मधील स्तंभ क्र.२ - हंगाम या स्तंभानंतर स्तंभ क्र.३-खाते क्रमांक हा स्तंभ समाविष्ट करून, सुधारीत गाव नमुना नं. बारा- पिकांची नोंदवही या नमुन्यात ठेवण्याबाबत क्षेत्रीय महसुली प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) च्या भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती मधील **गाव नमुना-बारा -**

**पिकांची नोंदवही या नोंदवहीचा सुधारीत नमुना या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे.**

**गाव नमुना -बारा**
**पिकांची नोंदवही**

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम २९.]

गाव :- तालुका :- जिल्हा :-

| भू-मापन क्रमांक व भू-मापन क्रमांकाचा उपविभाग | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | मिश्रणाच्या संकेत क्रमांकानुसार मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्ष | हंगाम | **खाते क्र.** | मिश्रणाचा संकेत क्रमांक | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| | | | | हे.आर. | हे.आर. | | हे.आर. | हे.आर. | | हे.आर. | हे.आर. | | हे.आर. | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

०२. महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) च्या भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील तरतूदीनुसार गाव नमुना- बारा - पिकांची नोंदवही ही क्षेत्रीय पातळीवर प्रत्येक गावात उक्त नमूद *सुधारीत नमुन्यात ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच* जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी **गा.न.नं. ७/१२** च्या संगणकीकरणाच्या प्रक्रीया यांमध्ये देखील या नमुन्यानुसार आवश्यक त्या सुधारणा संबंधितांकडून करून घेण्याची दक्षता घ्यावी.

०३. सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

०४. सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित जिल्ह्यात, यासंदर्भात वरीलप्रमाणे सुधारीत नमुना लागू करण्याच्या कार्यवाहीचा मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८१२२११७२५०८२४१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(राजेंद्र क्षीरसागर)**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,३२
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
९) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
१४) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१५) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
१६) सर्व सहसचिव /उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१७) “ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

*******